**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 06/04/2026

**आलोसे** - श्री. हारून अजिज शेख,नायब तहसीलदार(वर्ग-2) तहसील कार्यालय सिल्लोड, महसूल-1 व आरोपी श्री युवराज अभिमान तायडे व्यवसाय सेतू सुविधा केंद्र, चालक तहसील कार्यालय सिल्लोड यांनी तक्रारदार यांचेकडुन 10,000/- लाच स्विकारल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे सिल्लोड शहर छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | 1) श्री.हारून अजिज शेख, -पद नायब तहसीलदार(वर्ग-2) तहसील कार्यालय सिल्लोड, महसूल-1, ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर , रा. हातनुर बस स्टँड जवळ, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर.<br>2) आरोपी खाजगी इसम श्री युवराज अभिमान तायडे व्यवसाय सेतू सुविधा केंद्र, चालक तहसील कार्यालय सिल्लोड, ता. सिल्लोड. जि. छत्रपती संभाजीनगर,रा. जयभवानी नगर सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 15,000/- (पंधरा हजार रुपये ) |
| लाच स्विकृती रक्कम | 10,000/- (दहा हजार रुपये ) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री. वाल्मिक कोरे, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री.योगेश शिंदे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचा पकडलेला ट्रॅक्टर कारवाई न करता सोडण्यासाठी आणी हद्दीत ट्रॅक्टरची वाळु वाहतूक सुरळीत चालू ठेवन्यासाठी |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 06/04/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, यातील आलोसे क्रमांक 1) हारून आजीज शेख यांनी तक्रारदार यांना त्याचे मालकीचा ट्रॅक्टर गौण खनिज वाहतूक हद्दीत सुरळीत चालू ठेवण्या करिता व ट्रॅक्टर वर कोणतेही कारवाई न करण्यासाठी 25,000/- हजार रुपयांची लाच मागणी करून, तडजोडी अंती 15,000/- रुपये पंचांसमक्ष मागणी करून पहिला हप्ता 10,000/ हजार रुपये खाजगी इसम आरोपी युवराज तायडे सेतू मालक यांना बोलवून पंचा समक्ष यांच्याकडे देण्याचे सांगितले व उर्वरित 5000/ हजार नंतर देण्याचे सांगितले.<br>लाच मागणी नंतर दिनांक 06/04/2026 रोजी शासकीय पंच समक्ष सापळा कारवाई आजमावली असता खाजगी इसम युवराज तायडे सेतू चालक याने लाचेची 10, 000/- रुपये स्वीकारली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर तहसील कार्यालयातून आलोसे 1 नायब तहसीलदार हारून शेख यांना देखील ताब्यात घेण्यात आले.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे व अरोपी खाजगी इसम यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन सिल्लोड शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केली असुन पुढील तपास ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर घटक करणार आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री वाल्मीक कोरे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/ राजेंद्र जोशी, पोअंम/प्रकाश डोंगरदिवे, पो.अंम.चांगदेव बागुल, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064


**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.